# भगवंताची ओळख

भारतात गल्लीत, मदिरात, जागो-जागी सत्संगात आणि जेथे-जेथे साधु मंडळी नजरेस पडते. सर्व जण अपापल्या ईष्ट देवाला सर्व श्रेष्ठ, सर्व महान व भगवंत मानतात. भगवंताला भेटण्याची उत्कष्ठा सुध्दा सर्वांच्या ऱ्हदयात आहे परंतु पत्ता किंवा ङ्गिकाण माहित नसतांना त्यास शोधत आहेत, तो कोण आहे व कसा आहे, तो कोङ्गे राहतो आणि काय करतो, जेव्हा आपण त्यास भेटू तेव्हा आपल्याला काय मिळेल, त्याला भेटण्यासाङ्गी आपल्याला कसे बनावे लागेल, या गोष्टी जाणणे आवश्यक आहे. भारतात कोणी विष्णूला, कोणी श्रीकृष्ण व श्रीरामाला भगवंत मानतात तर कोणी निराकार मध्ये विश्वास ङ्केवतात. येथे आपण भगवंताबद्दल संक्षिप्तात चर्चा करुयात.

पहिली गोष्ट - कोणत्याही देहधारी ला (ज्यास स्वतःचा देह आहे) भगवंत म्हणता येणार नाही. देहधारी मनुष्य कोणी देवता असू शकतो किंवा महान पुरुष भगवतं तर निराकार आहे, याचा अर्थ आहे कि तो देह हित सदा अशरीरी ज्योति स्वरुप आहे.

दूसरी गोष्ट - भगवंत आत्म्यांप्रमाणे जन्म-मरणाच्या चक्रात येत नाहीत. जे जन्म-मरणात येतात ते भगवंत नाहीत आणि हे सुध्दा ध्यान रहावे कि जे देहधारी आहेत ते जन्म-मरणात अवश्य येतात, ते अचानक प्रगट होत नाहीत.

तिसरी गोष्ट -परमात्मा सृष्टि रुपी कल्प वृक्षाचे बीज आहेत म्हणून ते ज्ञानाचे सागर आहेत अर्थात सर्वज्ञ आहेत. कोणीही जन्म मरणात येणारी हस्ती सर्वज्ञ होऊ शकत नाही.

चौथी गोष्ट - परमात्मा सम्पूर्ण पावन, सदा पावन व सर्व शक्तिवान आहे. देवी देवता सम्पूर्ण पावन तर असतात, परंतु सदा पावन नसतात आणि देवतांसहित अन्य कोणी ही महान आत्मा सर्वशक्तिवान सूध्दा असू शकत नाही.

पाचवी गोष्ट - ते सर्वांचे परमपिता आहेत, स्वर्गाचे चरयिता आहेत, मुक्ति व जीवनमुक्ति देणार आहे. ते आत्म्यांचे पिता आहेत. सर्व धर्माच्या आत्म्यांचे पिता आहेत. हे नाते किंवा असा संबंध कोणत्याही देहधारीचा सर्वांशी असू शकत नाही.

या पाच लक्षणांवरुन आपण भगवंताला ओळखू शकतो, जाणून घेऊ शकतो. आपण स्वतः विचार करा कि काय ब्रम्हा भगवंत आहे, काय विष्णु भगवंत आहे वा शंकर भगवंत आहे. श्रीराम व विष्णु भगवंत आहे वा शंकर भगवंत आहे, श्रीराम भगवंत आहे का श्री कृष्ण भगवंत आहे का ? वास्तवात हे तर भगवंताची श्रेष्ठ रचना आहे, रचयिता तो आहे जो निराकार आहे, परमज्योति आहे आणि तो आहे शिव.

**- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स**

**www.bkvarta.com**